॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++'grade

**MEETING & ELECTION SECTION**

| Phone : (02462) 215246<br>Fax : (02462) 215572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|

## अधिसभेवर १० नोंदणीकृत पदवीधर निवडून देण्याकरिता निवडणुकी संबंधी नोंदणीकृत पदवीधरांची दुरूस्त मतदार यादी (Corrected Electoral Roll) प्रसिध्दी बाबत.

### जाहीर सूचना

संदर्भ १) Election Programme : No. SRTMUN/Election/2022-2023/304 Date : 16/09/2022
२) जा.क्रं. स्वारातीमविनां/नि.वे./नों.प.प्रा.म.या./२०२२–२३/३०५ दि. १६/०९/२०२२

सर्व संबंधितांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2)(t) नुसार १० नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर निवडून देण्यासाठी प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने नोंदणीकृत पदवीधर यांची संदर्भ क्र.०२ नुसार तात्पुरती मतदार यादी (List of Provisional Electoral Roll) दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजी विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर निवडणूक दालन Election Portal वर प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील तात्पुरत्या मतदार यादीमध्ये आपल्या नावासमोर काही दुरूस्ती/बदल असल्यास किंवा कांही हरकत/आक्षेप असल्यास त्या संदर्भात आपला लेखी अर्ज आवश्यक त्या कागदपत्र/दस्तऐवजासह स्वखर्चाने दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी कार्यालयीन दिवशी सभा व निवडणुक विभागात पोहचतील अशा बेताने सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने संबंधीतांनी विद्यापीठ कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रासह सादर केलेल्या अर्जाची विद्यापीठ अधिसूचना/ जाहिर सूचना /शासन अधिसूचना/शासनाचे सामाईक परिनियमातील तरतुदीप्रमाणे तपासणी करण्यात आली असून अधिसभेवर पदवीधर मतदार संघातून १० नोंदणीकृत पदवीधर निवडून देण्यासाठी नोंदणीकृत पदवीधरांच्या निर्वाचक गणाची दुरूस्त यादी (Corrected Electoral Roll) या जाहीर सूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सर्व संबंधीतांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, याबाबत काही आक्षेप असल्यास मा.कुलगुरू महोदयांकडे अपिल करता येईल. तथापि, लेखी अपिल सदर गटाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार आवश्यक ते कागदपत्र /दस्तऐवजासह **मा.कुलगुरू महोदयांच्या कार्यालयात दिनांक ०३ आक्टोंबर २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन दिवशी** पोहोचतील अशा बेताने सादर करणे आवश्यक आहे. विहीत केलेल्या तारखेनंतर व वेळेनंतर प्राप्त होणारे अपिल विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घेवून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

जा.क्र. स्वारातीमविनां/नों.प.दु.म.या./२०२२–२०२३/328
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२२

टिप: दि. ०१ आक्टोंबर २०२२ (पहिला शनिवार) रोजी मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय व सभा व निवडणूक विभाग कार्यालयीन वेळेप्रमाणे सुरू राहील.

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep 94 Nanded